**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक १८/०१/२०२४**

आरोपी लोकसेवक १) श्री. संतोष तोनगिरे, वय ५० वर्षे, पद-जिल्हा हिवताप अधिकारी, जालना, (वर्ग-२), २) श्री आण्णा तारु वय ४५ वर्षे, पद, आरोग्य सेवक, (वर्ग-३), ३) श्री भारत एकनाथ गांगुर्डे, वय ५५ वर्षे, पद, आरोग्य सहाय्यक, सर्व नेमणुक हिवताप कार्यालय, शहर विभाग, जालना, जिल्हा जालना, (वर्ग-३) यांनी तक्रारदार यांच्याकडे आज दिनांक 18/01/2024 रोजी तडजोडी अंती 15,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे कदिम जालना, जिल्हा जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | १) श्री. संतोष तोनगिरे, वय ५० वर्षे, नोकरी, जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा जालना, (वर्ग-२), २) श्री आण्णा तारु वय ४५ वर्षे, नोकरी, आरोग्य सेवक, (वर्ग-३), ३) श्री भारत एकनाथ गांगुर्डे, वय ५५ वर्षे, नोकरी, आरोग्य सहाय्यक, सर्व नेमणुक हिवताप कार्यालय, शहर विभाग, जालना, जिल्हा जालना, (वर्ग-३) |
| लाच रक्कम मागणी रक्कम | :- | प्रथम 20,000/-रुपये मागणी करुन तडजोडी अंती 15,000/- रुपये लाच मागणी |
| लाच स्विकृती रक्कम | | 15,000/- रुपये |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | :- | श्री हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री हरिदास डोळे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे अपंग प्रमाणपत्राची सेवा पुस्तीकेमध्ये नोंद घेण्यासाठी . |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार हे अपंग असुन त्यांचे अपंग प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तीकेमध्ये घेण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक क्रमांक 1 श्री संतोष तोनगिरे व आरोपी लोकसेवक क्रमांक 2 श्री आण्णा तारु यांनी तक्रारदार यांच्याकडे 20,000/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 20/12/2023 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्र. 2 श्री आण्णा तारु, यांनी तक्रारदार यांना रुपये 10,000/- ची मागणी केली. तसेच दिनांक 16/01/2024 रोजी परत आ लोसे क्र. 1 श्री संतोष तोनगिरे व आलोसे क्र. 2 श्री आण्णा तारु यांनी 15,000/- रुपयेची मागणी करुन आलोसे क्र. 3 श्री भारत गांगुर्डे यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम आलोसे क्र.1 श्री तोनगिरे यांना देण्या करीता प्रोत्साहीत केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे दि. 18/01/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आरोपी लोकसेवक 1) श्री संतोष तोनगिरे यांनी पंचा समक्ष तक्रारदार यांच्या कडुन तडजोडी अंती 15,000/- रुपये लाचेची रक्कम जिल्हा हिवताप कार्यालय, जालना येथे स्वत:चे कक्षात स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह आलोसे क्र. 1 श्री संतोष तोनगिरे व आलोसे क्र. 3 श्री भारत गांगुर्डे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन कदिम जालना, जिल्हा जालना येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री हनुमंत वारे, श्री हरिदास डोळे, पोलीस निरीक्षक, यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार साईनाथ तोडकर, दिगंबर पाठक, अशोक नागरगोजे, चालक पोह देवसिंग ठाकुर, रोमेश्वर ताठे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9823498777
पोलीस उप अधीक्षक :- 8668752530

(राजीव आ. तळेकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर